**जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख कार्यालयामधील एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व महसूल (माहिती तंत्रज्ञान) कक्षाकरीता अपर जिल्हाधिकारी संवर्गाची २ पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकिर्ण-०२२६/प्र.क्र.४१/आस्था-६**
**पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ०४ मार्च, २०२६**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६३/ल-१, दिनांक १८.०४.२०२२
२. मा.मंत्रीमंडळाच्या दि.२२.०२.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय.

प्रस्तावना :-

महसूल विभाग हा राज्याच्या प्रशासनाचा कणा असून खुद्द महसूल विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच भूमी अभिलेख विभाग हे स्थावर मालमत्तांशी संबंधित कामकाज हाताळतात. नागरिकांना जास्तीत जास्त लोकाभिमुख सेवा देण्यासाठी या तिनही विभागात संगणकीकरणाचे विविध उपक्रम कार्यरत आहेत. त्याचबरोबर भूसंपादन शाखा तसेच मदत व पुनर्वसन विभागांतर्गत संगणकीकरणाच्या विविध प्रणाली विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या सर्व विभागातील संगणकीकरणाच्या कामकाजाचे परिचालन, व्यवहार्यता, राज्यव्यापी अंमलबजावणी तसेच समन्वयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच महसूल विभागाकडील ई-फेरफार, ई-चावडी, ई-पीकपहाणी, इत्यादी प्रकल्पांकरीता जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे या कार्यालयात कायमस्वरुपी महसूल (माहिती तंत्रज्ञान) कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर दोन्ही कक्षाकरीता अपर जिल्हाधिकारी संवर्गाची २ पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महसूल विभागातील संगणकीकरणाच्या कामकाजाचे परिचालन, व्यवहार्यता, राज्यव्यापी अंमलबजावणी तसेच समन्वयाच्या अनुषंगाने एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच महसूल विभागाकडील ई-फेरफार, ई-चावडी, ई-पीकपहाणी, इत्यादी प्रकल्पांकरीता जमाबंदी आयुक्त कार्यालयात कायमस्वरुपी महसूल (माहिती तंत्रज्ञान) कक्ष स्थापन करण्यात आला आहे. **सदर दोन्ही कक्षांकरीता अपर जिल्हाधिकारी संवर्गाचे एस-२५ (७८८००-२०९२००) या वेतनश्रेणीतील प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण २ पदे निर्माण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.**

**२.** सदर अपर जिल्हाधिकारी संवर्गाच्या २ पदांना उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.०९.०१.२०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

**३.** सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि.२२.०२.२०२६ च्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३०४१२५२०२२०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.03.04 12:53:24 +05'30'

**( अश्विनी यमगर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (महसूल)/मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) महसूल व वन विभाग
५. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई/महाराष्ट्र (२), नागपूर
७. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे
८. उप सचिव (आस्था-१, आस्था-८), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवडनस्ती (आस्था-६)